


# आचारसंहिता आणि नैतिक मूल्य

## सचोटीला चालना देणे
## त्यांना जाणा त्यांविषयी बोला. त्यांना जगणे.

Magna इंटरनॅशनल





# सीईओंकडून संदेश

**“आचारसंहिता आणि नैतिक मूल्यांचा आढावा घेणे आणि ती समजून घेणे हे आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे जेणेकरून आपण आपल्या सर्व व्यवसायिक व्यवहारांमध्ये प्रामाणिकपणा आणि सचोटीने कार्य करू शकतो**

या उत्कृष्ठ कंपनीचा सीईओ म्हणून, आपण मिळवलेले यश, आपण उभी केलेली प्रतिष्ठा आणि आपण स्थापित केलेली विश्वासार्हता यांविषयी मला खूप अभिमान आहे. त्यामुळेच सर्वजण आपली आचारसंहिता आणि नैतिक मूल्यांचे पालन करत आहेत याची खात्री करून त्याद्वारे, आपण आतापर्यंत जे काही मिळवले आहे त्याचे संरक्षण करण्यासाठी आपली भूमिका बजावणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे.

जगभरातील शासकीय एजेंसीजनी त्यांच्या कायदेशीर अनुपालनावरील लक्ष केंद्रीत केले आहे, आणि त्यांच्या अन्वेषणांचा ऑटोमोटीव्ह क्षेत्रावर बारीक कटाक्ष असतो- अशी अन्वेषणे ज्यांपासून Magna मुक्त नाही.

जेव्हा अनैतिक वर्तणूकीची गोष्ट येते तेव्हा आपल्याकडे शून्य सहिष्णूता असते. एखाद्या कर्मचार्याने चांगल्या निष्ठेने समस्या कळवली तर त्याच्या विरूद्ध जर कोणीही सूड घेतला तर त्याकरिताही आपल्याकडे शून्य सहिष्णूता असते.

एक कर्मचारी म्हणून, आचारसंहिता आणि नैतिक मूल्यांचा आढावा घेणे आणि ती समजून घेणे हे आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे जेणेकरून आपण आपल्या सर्व व्यवसायिक व्यवहारांमध्ये प्रामाणिकपणा आणि सचोटीने कार्य करू शकतो

सचोटीने कृती करणे आणि जर इतर हे करत नाहीत असे दिसल्यास बोलून दाखवणे- हे आपले कर्तव्य बजावण्यासाठी प्रत्येकाकडे संधी आहे. Magna च्या अविरत यशासाठी सचोटीला चालना आणि योगदान दिल्याबद्दल धन्यवाद.

विनम्र,



डोनाल्ट जे. वॉकर
मुख्य कार्यकारी अधिकारी





# अनुक्रमणिका


सीईओंकडून संदेश
आचारसंहिता आणि नैतिक मूल्यांचा परिचय 2
हे कर्मचार्यांसाठी महत्त्वाचे का आहे 5

## व्यवसायिकव्यवहारांमध्ये सचोटीला चालना देणे

सचोटी, नि:पक्षता आणि आदराने व्यवसायाचे आयोजन करणे 7
ॲन्टीट्रस्ट आणि स्पर्धा कायद्यांचे अनुपालन करणे 7
लाचखोरी-विरोधी कायद्यांचे पालन करणे 8
प्रचार करणे< / राजकीय सहभाग 9

## पारदर्शक वृत्तांताद्वारे सचोटीला चालना देणे

आर्थिक वृत्तांत 12
अयोग्य रोखे विक्री 13
सार्वजनिक प्रकटीकरण 13

## आपल्या कार्यस्थळाअंतर्गत सचोटीला चालना देणे

पर्यावरण आणि व्यावसायिक आरोग्य आणि सुरक्षितता 15
वैयक्तिक माहितीचे रक्षण 15
मानवी हक्कांसाठी आदर 16
विविधता आणि समावेश 16

## आपल्या कृतींमधून सचोटीला चालना देणे

गोपनीय माहितीचा वापर 19
गुंतवणूक आणि कॉर्पोरेट संधी 19
स्वयं-व्यवहार आणि नातेवाईक किंवा मित्रांसोबत संवाद साधणे 20
बहिर्गत पदे 21
भेटी, जेवण आणि मनोरंजन 21

## चांगल्या संप्रेषणासोबत सचोटीला चालना देणे

काळजीपूर्वक संप्रेषण 23
दि गुड बिजनेस लाईन 24

कायदेशीर अनुपालन तज्ञाकडून समर्थन 25
शब्दवली 26

रंगांमध्ये आणि इटालिक स्वरूपात दिसणार्या संज्ञा या शब्दावलीमध्ये स्पष्ट केल्या गेल्या आहेत.



# परिचय

## आपल्या कॉर्पोरेट धोरणांशी नैतिक आणि सुसंगत व्यवसायाचे आयोजन करण्यासाठी आपण सर्वांनी आपली जबाबदारी समजून घेणे महत्वाचे आहे.

आज, ऑटोमोटिव्ह उद्योग अखंडपणे अधिक गुंतागुंतीचा आणि आव्हानात्मक बनत चालला आहे, त्यामुळे आपल्या कॉर्पोरेट धोरणांशी नैतिक आणि सुसंगत व्यवसायाचे आयोजन करण्यासाठी आपण सर्वांनी आपली जबाबदारी समजून घेणे महत्वाचे आहे.

Magna च्या न्यायचित उपक्रम संस्कृतीची मुख्य मूल्ये आणि व्यवसायिक तत्वे ही आमच्या कर्मचारी सनद आणि कार्यकारी तत्त्वांमध्ये समाविष्ट आहेत आणि आचारसंहिता आणि नैतिक मूल्यांद्वारे त्या पुनर्बलित केल्या जातात. ही संहिता आपल्याला आपली नैतिक मानके राखण्यास मदत करण्यासाठी मार्गदर्शक म्हणून काम करते.

प्रत्येक Magna कर्मचार्याने लागू होणार्या कायद्यानुसार कार्य करावे आणि आमची मुख्य मूल्ये आणि व्यवसाय तत्त्वांसोबत सुसंगत राहावे ही Magna ची अपेक्षा आणि आवश्यकता आहे. आमचे पुरठागार, सल्लागार, स्वतंत्र कंत्राटदार, एजंट आणि इतर प्रतिनिधींनी ही मानके पूर्ण करावीत ही आमची अपेक्षा आहे. या संहितेचा भंग केल्यास ती कर्मचार्यावर बडतर्फीपर्यंत आणि त्यासोबतच शिस्तभंगाची कारवाई करण्यास कारणीभूत ठरू शकते, आणि परिणामी तृतीय पक्षांसोबतच्या आमचे संबंध समाप्त होऊ शकतात.

हे मानक आपण खालील गोष्टी कशा करतो त्याला लागू होते:

- कार्यस्थळावर एकमेकांना दिली जाणाअरी वागणूक;
- आमच्या पर्यावरणीय जबाबदार्या व्यवस्थापित करणे;
- स्पर्धकांसोबत गुंतणे;
- सरकारी अधिकार्यांसोबत परस्पर संवाद; आणि
- Magna ची तसेच ग्राहकांच्या गोपनीय माहितीची संरक्षण करणे

प्रामाणिकपणा, सचोटीने वागणे आणि सर्ववेळ नैतिक निवडी करण्यासाठी आपल्यातील प्रत्येकजण जबाबदार आहे. हा आपल्या कामाचा मुख्य भाग आहे. Magna चा अनुपालन संघ हा या क्षेत्रामध्ये यश सक्षम करण्यासाठी आवश्यक प्रशिक्षण आणि अखंड समर्थन पुरविण्यासाठी वचनबद्द आहे.

एक Magna कर्मचारी म्हणून आमची कर्तव्ये पूर्ण करण्यामध्ये हे कागदपत्र आम्हाला मार्गदर्शन करण्यासाठीचा एक स्रोत म्हणून पुरवले गेले आहे, आणि ते स्थानिक आणि आंतरराष्ट्रीय कायद्यांच्या अनुपालनाच्या खात्रीकरिता विषयी प्रदान करते.

## आचारसंहित आणि नैतिक मूल्ये मला लागू होतात का?


होय. आचारसंहिता आणि नैतिक मूल्ये ही Magna इंटरनॅशनल इन्क.चे कर्मचारी आणि जागतिकरित्या तिचे सर्व कार्यकारी गट, विभाग, संयुक्त उद्यम आणि इतर कार्यांना लागू होतात. ही आपले सर्व संचालक, अधिकारी आणि जे कोणी Magna च्या वतीने कार्य करतात जसे सल्लागार, स्वतंत्र कंत्राटदार, एजंट आणि इतर प्रतिनिधींना लागू होते.

## जर मी संहितेचा भंग केला तर त्याचे परिणाम काय असतील?

आपण आचारसंहिता आणि नैतिक मूल्यांच्या मूल्यांशी सखोलतेने वचनबद्ध आहोत आणि आम्ही या वचनबद्धतांना उचलून धरण्यामध्ये कोणतेही अपयश आले तर आम्ही ते गंभीरतेने घेऊ. संहितेचे उल्लंघन केल्यास ते शिस्तभंगाच्या कारवाईला कारणीभूत असेल. शिक्षेचा प्रकार हा भंगाच्या तीव्रतेवर अवलंबून असेल आणि त्यामध्ये गंभीर बाबींमध्ये कारण किंवा चांगल्या कारणांमुळे बडतर्फीचा समावेश होतो.


आमच्या कर्मचार्यांकडून अपेक्षित नैतिकता मानके पूर्ण करण्यास जे पुरवठागार, सल्लागार, स्वतंत्र्य कंत्राटदार, एजंट्स किंवा इतर प्रतिनिधीं अपयशी ठरतील त्यांच्याकरिताही परिणाम हे सारखे असतील. जर भंग हा अत्यंत गंभीर असेल, तर आम्ही तृतीय पक्षासोबतचे आमचे संबंध संपुष्टात आणू शकतो.

संहितेचे काही भाग हे सहजपणे लागू होणार्या कायदेशीर आवश्यकता प्रतिबिंबित करतात हे तुम्ही लक्षात ठेवावे. याचा अर्थ, काही बाबतीत, जी कृती संहितेचा भंग करते ती कायद्याचाही भंग करते. या उदाहरणांमध्ये, शिक्षेमध्ये दंड किंवा तुरूंगवासाचा समावेश होऊ शकतो.




या संपूर्ण कागदपत्रामध्ये पुरवलेले प्रश्न आणि उदाहरणे ही पूर्णपणे उदाहरणात्मक आहेत, ती वास्त-विक प्रसंग विश्लेषित करत नाहीत आणि ती आचार संहिता आणि नैतिक मूल्यांतर्गत उद्भवणार्या सर्व किंवा अधिकांश गंभीर बाबी, ग्रहण करण्यासाठी उद्देशित नाही कृपया हे लक्षात घ्या.

# Driving Integrity
## Know it. Speak it. Live it.



# हे कर्मचार्यांसाठी महत्त्वाचे का आहे

## आमच्या निवडी सचोटीला चालना देतात

जीवन हे निवडींनी भरलेले असते, आणि आम्ही दररोज, त्यांतील अनेक निर्णय त्याक्षणी तत्परतेने घेतो.

परंतु काही निवडी या इतरांपेक्षा बर्याच प्रमाणात महत्त्वाच्या असतात. आणि आपण सर्वकषपणे एक कंपनी म्हणून तसेच आम्हाला स्वत:ला Magna चे प्रतिबिंब म्हणून सादर करून आपण निवड करतो.

थोडक्यात, आपल्या निवडी सचोटीला चालना देतात.

Magna कडे आचार संहिता आणि नैतिक मूल्ये आहेत जी कार्यस्थळावर उत्तम निर्णय घेण्यासाठी आपणांस मार्गदर्शन करण्यास मदत करतात. ही संहिता कॉर्पोरेट/गट कार्यालये, निर्माण विभाग आणि संयुक्त उद्यमांसह जागतिकरित्या सर्व Magna कर्मचार्यांना लागू होते.

नेहमी नैतिक आणि प्रामाणिकपणे कार्य करण्यासाठी Magna सर्व कर्मचार्यांनी आचार संहिता आणि नैतिक मूल्ये वाचावीत आणि समजून घ्यावीत अशी अपेक्षा करते. आता आणि भविष्यामध्ये आपल्या यशासाठी योग्य निर्णय घेणे आणि आपल्या व्यवसायाला शासित करणार्या कायदे आणि नियमनांचे पालन करणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे.

## तुम्ही काय करू शकता

संपूर्ण संघटनेमध्ये सचोटीला चालना देण्यास आम्हाला मदत करण्याकरिता आम्ही तुमच्यावर अवलंबून आहोत. आम्ही तुम्हाला विचारत आहोत

- आचारसंहिता आणि नैतिक मूल्ये आणि संबंधित धोरणाविषयी जाणून घेण्यासाठी
- तुम्हाला जर आचार संहितेचे आणि नैतिक मूल्यांचे संभाव्य उल्लंघन उद्भवले आहे असे वाटत असेल, किंवा तुम्हाला संहितेविषयी प्रश्न असतील तर बोला.
- दररोज आचारसंहिता आणि नैतिक मूल्ये घडवणारी मुलभूत तत्त्वे जगण्यासाठी

हा आमच्या बोलण्याचा अर्थ आहे: **त्यांना जाणा त्यांविषयी बोला. त्यांना जगणे.** लोकांनी सक्रिय सहभाग घेणे आणि आपण सर्वजण व्यवसाय नैतिक प्रकारे आयोजित करण्याची खात्री करणे यावरच Magna चे यश अवलंबून असते.

## कार्यकारी/ वरिष्ठ अधिकारी/ व्यवस्थापकांकडून अपेक्षा

कंपनीचे अध्यक्ष म्हणून, Magna कार्यकारी, वरिष्ठ अधिकारी आणि व्यवस्थापकांनी स्वत:साठी उच्च नैतिकता मानके प्रस्थापित करण्याचे अपेक्षित आहे, परिणामी ते त्यांच्या संघांद्वारे अनुपालन करण्यासाठी उदाहरण स्थापित करू शकतात. Magna च्या अध्यक्षनांनी संहितेच्या कोणत्याही संभाव्य उल्लंघनाविषयी कार्यकुशल आणि सतर्क राहणे आणि समयोचित आधारावर समस्यांचा वृत्तांत देणे अपेक्षित आहे. कर्मचार्यांना अनुपालन समस्या संकलित करण्यामध्ये सोयीचे वाटावे याकरीता त्यांनी तसे पर्यावरण राखावे. हे उदाहरणाने असलेले नेतृत्व हे संहितेमध्ये अधोरेखित केलेल्या कंपनी व्यापक वर्तणूकीची मानके स्थापित करणे आणि ती कायम ठेवण्यासाठी निर्णायक आहे.





# व्यवसायिक व्यवहारांमध्ये सचोटीला चालना देणे


सचोटी, नि:पक्षता आणि आदराने व्यवसायाचे आयोजन करणे 7

ॲन्टीट्रस्ट आणि स्पर्धा कायद्यांचे अनुपालन करणे 7

लाचखोरी-विरोधी कायद्यांचे पालन करणे 8

प्रचार करणा आणि राजकीय सहभाग 9

# सचोटी, नि:पक्षपातीपणा आणि आदराने व्यवसायाचे आयोजन करणे

आपण सर्वजण, कर्मचारी आणि व्यवस्थापन हे समान आहेत, Magna च्या यशाच्या खात्रीकरिता जबाबदारी सामायिक करत आहेत हे आपले संचालन तत्त्वज्ञान आहे.

ही जबाबदारी वास्तवात आणण्यासाठी, आम्ही सर्वांनी सचोटीने कार्य करावे. याचा अर्थ, आपण आपल्याला लागू होणार्या कायद्यांच्या अक्षरांचे आणि खर्या हेतूंचे पालन करावे, या संहितेला उचलून धरावे आणि आपल्या वचनबद्धतांचा आदर करावा.

आम्ही इतर कर्मचारी, ग्राहक, पुरवठागार आणि इतर भागधारकांसोबत आपल्या व्यवहारांमध्ये नि:पक्षपाती राहावे.

इतर लोक ज्यांचे विचार आणि मत वेगळे असते त्यांचाही आदर करणे महत्त्वाचे असते, आपण कार्य करतो त्या देशांची संस्कृती आणि रूढींसोबत संवेदनशीलतेने आणि काळजीने कार्य करावे, आणि आपण जेथे आपला व्यवसाय आयोजित करतो तेथील समुदाय आणि पर्यावरणावर आपला प्रभाव टाकण्याचा प्रयत्न करावा.

# ॲन्टीट्रस्ट आणि अनुपालन कायद्यांसोबत अनुपालन

आम्ही अति जलदपणे स्पर्धा करतो, परंतु त्यासोबतच आपण मुक्त आणि नि:पक्षपाती स्पर्धेचाही आदर करतो. परिणामी, Magna कर्मचारी हे सर्व लागू होणारे ॲन्टीट्रस्ट आणि स्पर्धा कायद्यांसोबत अनुपालन करण्यासाठी वचनबद्ध आहे. किमती, सूट किंवा विक्रीच्या अटी ठरवण्यासाठी आमच्या स्पर्धकांसोबत सहमत होणे, उत्पादन मर्यादित करणे, बाजाराची विभागणी करणे, बोलीच्या कृतींमध्ये समन्वय घडवणे किंवा ग्राहक किंवा पुरवठागारांवर बहिष्कार टाकणे अशा या कायद्यांचा भंग करणार्या कोणत्याही गतिविधींमध्ये आम्ही सहभागी नसतो.

आमचे ॲन्टीट्रस्ट आणि स्पर्धेवरील धोरण , आम्ही ही वचनबद्धता कशाप्रकारे धरून ठेवतो याविषयीचे पूर्ण स्पष्टीकरण पुरवते.

Driving Integrity
Know it. Speak it. Live it.

प्र: ऑटो शांघाय येथे, मला एक पूर्वीचा विक्री सहकारी भेटला जो आता स्पर्धकासाठी काम करतो. दुपारच्या जेवणादरम्यान, त्यांने आपण अवघड नवीन खरेदीदाराला हाताळण्याकरिता संयुक्त धोरण करण्याविषयी विचारले. मी त्याला नंतर कळवेल असे म्हटले. मी काय करायला हवे होते?

उ: पूर्वीच्या सहकार्यासोबत अनपेक्षित दुपारचे जेवण करण्यामध्ये कोणतीही समस्या नाही, परंतु स्पर्धकासोबत धोरणाचा समन्वय करण्याचा प्रयत्न करण्यास सक्तपणे मनाई आहे. अशा स्थितीमध्ये, तुम्ही धोरण समन्वयाबाबतचे संभाषण त्वरित समाप्त करावे आणि तुमच्या सहकार्याला तुम्ही या विषयी बोलू इच्छित नाही असे सांगावे. मग तुम्ही याची कल्पना त्वरित तुमचे व्यवस्थापक किंवा कायदेशीर अनुपालन तज्ञ यांना द्यावी.

# लाचखोरी-विरोधी कायद्यांचे अनुपालन करणे

आम्ही एकतर, प्रत्यक्ष किंवा तृतीय पक्षांद्वारे, लाच किंवा दलाली ऑफर करत नाही किंवा स्वीकारत नाही. मूल्य असलेल्या वस्तू, देताना किंवा स्वीकारताना, आपण हे व्यवसाय निर्णयावर परिणाम करू शकते किंवा नाही किंवा इतरांवर तसा प्रभाव टाकू शकते किंवा नाही याचा विचार करावा. आपण करतो त्या प्रदानांच्या नोंदी अचूक आणि पूर्ण असल्याची खात्रीही आपण करावी. या जबाबदार्या सर्व बाबतीत लागू होतात, परंतु त्या शासकीय अधिकारी सहभागी असल्याच्या बाबतीत विशेषत: सक्त असतात.

आपली वचनबद्धता, स्थानिक कायदे किंवा सांस्कृतिक पद्धती काय आहेत हे लक्षात न घेता लाचखोरी-विरोध हा अपवादाशिवाय, आपल्या सर्व कार्यांना लागू होतो. आपल्या वतीने काम करणार्या तृतीय पक्षांनीही, हे तत्व उचलून धरण्याची अपेक्षा आपण करतो.

लाचखोरी मुक्त व्यवसायाचे आयोजन करण्यासाठी आपल्या वचनबद्धतेविषयी आणखी शोधून काढण्यासाठी, आपले लाचखोरी आणि अयोग्य प्रदांविषयीचे धोरण पहा.



प्र: माझ्या देशामध्ये, शासकीय कर्मचार्यांना लघु प्रदान (सामान्यत: $100 च्या आत) करणे हे सामान्य आहे ज्यामुळे काम अधिक तत्परतेने पूर्ण केले जाते. आपली संहिता आणि धोरणांअंतर्गत अशी प्रदान करण्यास मला परवानगी आहे का?

उ: नाही. आपली संहिता आणि लाचखोरी आणि अयोग्य प्रदानांवरील धोरण आपल्याला अशी प्रदाने करण्यापासून प्रतिबंधित करते. आपण विश्लेषित करता त्या प्रदानाच्या प्रकाराला "फॅसिलिटेशन प्रदान" किंवा "ग्रीज प्रदान" असे म्हटले जाते. काही देशांमध्ये जरी ही प्रदाने कायदेशीर आणि सामान्य असली, तरी अनेक इतर देशांमध्ये ती बेकायदेशीर असतात.

प्र: आपल्या सुरक्षेच्या अनुपालनाकडे पाहणार्या शासकीय अधिकार्याने मला त्यांच्या पुतण्याचा रिज़ुमे दिला आणि माझ्या विभागामध्ये कदाचित असलेल्या कोणत्याही पदाकरिता त्याचा विचार करण्याचे मला सांगितले. मी रिज्युमेचा आढावा घेतला आणि त्याचे क्रेडेंशिअल्स बळकट होते. मी काय करावे?

उ: या विनंतीविषयी आपण त्वरित तुमचे व्यवस्थापक किंवा कयदेशीर अनुपालन तज्ज्ञाला कळवावे. एक पात्र आवेदक म्हणून, त्याला त्या पदाकरिता इतर पात्र आवेदकांसारखीच वागणूक दिली जाईल. आपल्या संबंधांना संभाळून आपण कायदे आणि आपल्या मूल्यांचा आदर करतो, याच्या खात्रीकरिता अशा प्रकारच्या विनंत्या काळजीपूर्वक हाताळल्या जायला हव्या.



# प्रचार करणे आणि राजकीय सहभाग

**प्रचार करणे** आणि राजकीय सहभाग शासित करणारे कायदे हे अत्यंत जटील असू शकतात आणि आम्ही व्यवसाय करतो अशा ठिकाणांदरम्यान ते मोठ्याप्रमाणात बदलू शकतात, त्यामुळे आपल्याला प्रचंड काळजी घेऊन, आर्थिक मदत आणि समर्थनासह प्रचार करणे आणि राजकीय सहभाग प्रयत्न हाताळण्याची आवश्यकता आहे.

हे मुद्दे हाताळण्यासाठी विशेषत: अधिकृत कॉर्पोरेट कार्यालय प्रतिनिधीच्या लेखी परवानगीशिवाय Magna च्या वतीने कोणत्याही पातळीवरील शासनासोबत प्रचारामध्ये सहभागी होऊ नका किंवा राजकीय योगदान करू नका (पैशांच्या स्वरूपातील देणग्या, वस्तू किंवा सेवांसह). अधिक माहितीसाठी, कृपया कायदेशीर अनुपालन तज्ञ किंवा शासकीय प्रकरणे संघाचा सदस्य यांच्यासोबत बोला किंवा MagNET वर शासकीय प्रकरणे पृष्ठावर जा.

प्र: Magna च्या नवीन प्लांटच्या इमारतीची रचना करण्यासाठी शहर परिषदेची मंजूरी प्राप्त करण्यासाठी Magna ला काही समस्या येत आहे. शहर सल्लागार माझ्या चांगल्या ओळखीची आहे आणि तीने याचे समर्थन का करावे हे स्पष्ट करण्यासाठी मला तिला कॉफीकरिता आमंत्रित करायला आवडेल. मी असे करू शकतो का?

उ: नाही. निवडलेल्या शासकीय अधिकार्यांसोबत अशा प्रकारची सभा ही सार्वजनिक निर्णय घेण्यावर प्रभाव टाकण्याच्या हेतूने असू शकते, हे स्थानिक कायद्यांतर्गत प्रचाराचा भाग असण्याची शक्यता असते. हे मुद्दे हाताळण्यासाठी विशेषत: अधिकृत कॉर्पोरेट कार्यालय प्रतिनिधीच्या लेखी परवानगीशिवाय आपण प्रचार करण्याच्या कोणत्याही कृतीमध्ये सहभागी होऊ नये.

Driving Integrity
Know it.
Speak it.
Live it.

आपण सर्वजण, कर्मचारी आणि व्यवस्थापन हे समान आहेत, Magna च्या यशाच्या खात्रीकरिता जबाबदारी सामायिक करत आहेत हे आपले संचालन तत्वज्ञान आहे. ही जबाबदारी वास्तवात आणण्यासाठी, आम्ही सर्वांनी सचोटीने कार्य करावे. याचा अर्थ, आपण आपल्याला लागू होणार्या कायद्यांच्या अक्षरांचे आणि खर्या हेतूंचे पालन करावे, या संहितेला उचलून धरावे आणि आपल्या वचनबद्धतांचा आदर करावा.








# पारदर्शक वृत्तांतादवारे सचोटीला चालना देणे


आर्थिक वृत्तांत 12

अयोग्य रोखे विक्री 13

सार्वजनिक प्रकटीकरण 13

# आर्थिक वृत्तांत

Magna ची विश्वासार्हता ही आर्थिक अहवालांच्या अचूकतेवर अवलंबून असते आणि आपण आर्थिक अहवालांविषयीच्या सर्व लागू होणार्या कायद्यांचे पालन केले पाहिजे. आम्ही आपल्या आर्थिक नोंदींमध्ये पूर्णपणे अचूक असायला हवे.

आपली आर्थिक नियंत्रणे अहवालांची अचूकता आणि त्यांच्या समायोचिकतेच्या पुष्टी करण्यासाठी तयार केली गेली आहेत. या नियंत्रणांना चुकीच्या किंवा दिशाभूल करणार्या नोंदीद्वारे युक्तीपूर्वकरित्या बगल देण्यास कोणीही कोणतेही पाऊल घेत असेल किंवा कोणालतरी असे पाऊल घेण्याची आज्ञा करत असेल तर हे अजिबात सहन केले जाणार नाही. असे करणे हे संहितेचे उल्लंघन असेल आणि हा दंडात्मक गुन्हाही होऊ शकतो.

प्र: मी हिशेबतपासणीमध्ये काम करतो आणि अलिकडे मला मोठ्या संख्येनी पुरवठागारांचे इन्वॉईसेस मिळाली. माझ्या वरीष्ठाने ती पुढच्या तिमाहीमध्ये नोंदवण्याचे सांगितले. असे केल्यास हे आपले आर्थिक परिणाम सुधारेल आणि आम्हाला किमती सामायिक करण्यास मदत करेल. मी तिच्या सुचना पाळाव्या का?

उ: नाही. चुकीचा दिनांक टाकणे किंवा खर्चाचे विलंबित वृत्तांतांमुळे या तिमाहीमध्ये अतिशयोक्तीयुक्त उत्पन्नाला दिसेल आणि ते आपल्या आर्थिक परिणामांवरही प्रभाव टाकू शकते. सर्व आर्थिक माहिती अचूकपणे नोंदवण्यातील अपयशी, जरी ते Magna ला मदत करण्याच्या हेतूने केले गेले असले तरीही, हे संहिता आणि सामान्यपणे स्वीकृत हिशेबतपासणी तत्त्वांचे उल्लंघन असते. जर तुमचे वरिष्ठ तुम्हाला असे करण्यास सांगत अएल, तर आपण नकार द्या. जर तुम्हाला तुमच्या वरिष्ठासोबत सोयीचे वाटत नसे किंवा ते दबाव देत असतील, तर तुम्ही ही गोष्ट त्वरित गट किंवा कॉर्पोरेट कार्यायामधील आर्थिक अधिकारी किंवा कायदेशीर अनुपालन तज्ञानाला याची माहिती द्यावी. आपण गुड बिजनेस लाईनचा वापर करूनही समस्येची माहिती देऊ शकता.



# अयोग्य रोखे विक्री

आपल्या कधीकधी कर्मचार्यांना त्यांच्या कार्याद्वारे Magna , पुरवठागार, स्पर्धक, ग्राहक किंवा व्यवसाय भागीदारांच्या गोपनीय माहितीपर्यंत ॲक्सेस मिळू शकतो. ही अंतर्गत माहिती, जर कर्मचार्यांद्वारे गुंतवणूक हेतूंकरिता वापरली गेली, तर तो कर्मचारी गुंतवणुकदारांविरूद्ध गैरवाजवी फायदा घेत असतो. अंतर्गत माहितीवर आधारित भाग आणि बॉन्ड्ससारखे रोखे खरेदी करणे किंवा विक्री करणे हे बेकायदेशी आहे आणि त्याचे दंड तीव्र असू शकतात. त्यामुळे, तुमच्याकडे Magna किंवा इतर कंपनीविषयीची अंतर्गत माहिती असेल, तर माहिती सार्वजनिक होईपर्यंत आणि गुंतवणुकदारांना याविषयी मूल्यांकन करण्याची संधी मिळेपर्यंत तुम्हाला कंपनीमध्ये गुंतवणूक करण्यास प्रतिबंध असेल.

जर कर्मचार्यांना माहिती मिळवण्याचा अधिकार नसेल तर कर्मचार्यांना सह-कर्मचार्यांसोबत किंवा Magna च्या बाहेरील लोकांसोबत अंतर्गत माहिती सामायिक करण्यास परवानगी नाही. ही मनाई नातेवाईक किंवा जवळच्या मित्रांसोबत अंतर्गत माहिती सामायिक करण्यापर्यंत विस्तारते.

Magna चे संचालक आणि अधिकारी आणि अंतर्गत व्यापार आणि वृत्तांतावरील धोरणामध्ये सूचीबद्ध नियुक्त इतर व्यक्तींसाठी आणखी आव्हानात्मक आवश्यकता असतात. या व्यक्तींना काही कालावधी दरम्यान Magna रोखे खरेदी किंवा विक्री करण्यापासून मनाई केली जाते.

आपले अंतर्गत व्यापारी आणि वृत्तांतावरील धोरण अंतर्गत व्यापार आणि अयोग्य प्रकटीकरण कसे टाळावे यावर मार्गदर्शन पुरवते.

Driving Integrity
Know it.
Speak it.
Live it.

प्र: अंतर्गत अहवालावर आधारित, Magna ची विक्री ही लक्षणीयरित्या वाढली आहे आणि या तिमाहीकरिताचा आपला नफा हा उद्योग विश्लेषकांद्वारे अपेक्षित नफ्यापेक्षा जास्त असेल हे मला माहित आहे. आम्ही आमच्या तिमाही उत्पनाची घोषणा करण्यापूर्वीच माझ्या बहिणीला भाग खरेदी करायला सांगू शकतो का?

उ: नाही. कुटुंब आणि मित्रांसह अंतर्गत माहिती स्वत:च्या किंवा इतरांच्या फायद्यासाठी वापरणे, हे आपल्या संहितेच्या विरूद्ध आणि बेकायदेशीर आहे.

# सार्वजनिक प्रकटीकरण

सार्वजनिक कंपनी म्हणून, सार्वजनिक कागदपत्रांमध्ये पूर्ण, अचूक आणि समयोचित माहिती पुरवणे ही Magna ची जबाबदारी आहे. आम्ही जबाबदारी अत्यंत गंभीरतेने घेतो आणि आमचा व्यवसाय, कार्ये आणि आर्थिक स्थितीच्या प्रकटीकरणाशी संबंधित सर्व लागू कायद्यांचे पालन करण्याचा प्रयत्न करत असतो. या जटील कायदेशीर आवश्यकतांचे अनुपालन करण्यासाठी, Magna ने वरिष्ठ कॉर्पोरेट व्यवस्थापन असलेली कॉर्पोरेट प्रकटीकरण समिती स्थापित केली आहे.

माध्यमे किंवा भागधारकांशी बोलण्यासाठी किंवा कोणत्याही प्रकारे सार्वजनिक प्रकटीकरण करण्यासाठी कोणत्याही अधिकृत कर्मचार्याने लागू होणारे रोख्यांचे कायदे आणि आपल्या कॉर्पोरेट प्रकटीकरणावरील धोरणाचे पालन करावे.

आमच्या कॉर्पोरेट प्रकटीकरणाच्या धोरणा मध्ये अधिक तपशील मिळू शकतो.




# आपल्या कार्यस्थळाअंत-र्गत सचोटीला चालना देणे


पर्यावरण आणि व्यावसायिक आरोग्य आणि सुरक्षितता 15

वैयक्तिक माहितीचे रक्षण 15

मानवी हक्कांसाठी आदर 16

विविधता आणि समावेश 16

आपल्या जागतिक कंपनीसाठी सामर्थ्याचा स्रोत हा आपल्या कर्मचार्यांची विविधता आहे. त्यामुळे आम्ही विविध पार्श्वभूमी, क्षमता आणि मत असलेल्या लोकांना महत्त्व आणि आदर देतो.

# पर्यावरण आणि व्यवसायिक आरोग्य आणि सुरक्षितता

Magna कर्मचारी सुरक्षित आणि साफ पर्यावरणामध्ये काम करतील हे महत्त्वाचे आहे. व्यवसायिक आरोग्य आणि सुरक्षितता आणि आपल्या सर्व कार्यांमध्ये पर्यावरणीय जबाबदारी यांमध्ये आपल्याला उद्योग अग्रेता बनायचे आहे.

आम्ही आपल्याला लागू होत असलेले सर्व आरोग्य, सुरक्षितता आणि पर्यावरणीय कायदे आणि नियमनांना पूर्ण करण्यासाठी किंवा त्याच्या पलिकडे जाण्यासाठी वचनबद्ध आहोत आणि अखंड सुधारणेच्या ध्येयासह प्रत्येक कार्याचे परीक्षण आणि पुनरावलोकन करण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे.

आरोग्य, सुरक्षितता आणि पर्यावरणाली असलेली वचनबद्धता ही आपल्या कर्मचारी सनद आणि कार्यकारी तत्त्वांमध्ये विश्लेषित केली आहे आणि आपल्या आरोग्य, सुरक्षितता आणि पर्यावरणीय धोरणामध्ये अत्यंत तपशीलवारपणे स्पष्ट केली आहे.

# वैयक्तिक माहितीचे रक्षण

आम्ही आमच्या कर्मचार्यांच्या गोपनीयतेचा आदर करतो आणि आम्ही त्यांच्या खाजगी माहितीचे संरक्षण करण्यासाठी वचनबद्ध आहोत. आम्ही केवळ कायदेशीर व्यवसायासाठी आणि रोजगार हेतूसाठी किंवा कायद्याने जर आवश्यकता असेत तरच खाजगी माहिती संकलित करू, तिचा वापर करू आणि ती उघड करू. आम्ही गोळा केलेल्या खाजगी माहितीच्या गोपनीयतेचे रक्षण करण्यासाठी आम्ही इष्टतम पाऊलेही घेऊ.

Driving Integrity
Know it.
Speak it.
Live it.

प्र: मी विभागामध्ये मानव संसाधन विभागात काम करतो. एका विपणन कंपनीने अलिकडे मला आपल्या सर्व कर्मचार्यांच्या पत्त्याची मागणी केली जेणेकरून ते नवीन मेडिकल क्लिनिकविषयी काही महत्त्वाची माहिती पाठवू शकतील. जरी कर्मचार्यांना माहितीमधून संभाव्यत: फायदा होणार असला तरीही, मी विपणन कंपनीला नकार दिला. मी योग्य गोष्ट केली का?

उ: होय, तुम्ही केले. आपल्या कर्मचार्यांचे घरचे पत्ते ही खाजगी माहिती असते आणि ती केवळ कायदेशीर व्यवसाय आणि रोजगार कारणे किंवा जर कायद्याने आवश्यकता असेल तेव्हा उघड केली जाऊ शकतात. या बाबतीत, ही खाजगी माहिती उघड करण्यासाठी कर्मचार्यांना सेवेचे विपणन करणे हे स्वीकार्य कारण नाही. असे केल्यास आम्ही संहितेचे उल्लंघन करू आणि ते स्थानिक गोपनीयता कायद्यांनुसार बेकायदेशीर असू शकते.

# मानवी हक्कांचा आदर करणे

आपल्या कर्मचार्यांच्या आणि इतर भागधारकांच्या सर्व मानवी हक्कांसाठी आदर हे आपल्या व्यवसायासाठी महत्त्वाचे आहे. आम्ही आपल्याला लागू होणारे सर्व मानवी हक्क कायदे आणि नियमनांचे पालन करू इच्छित आहोत.

आम्ही आमच्या कर्मचार्यांसाठी नि:पक्षपाती कार्यकारी स्थिती पुरवतो आणि आमच्या पुरवठा शृंखलेमध्ये बालमजुरी किंवा वेठबिगारीला सहन करत नाही. आम्ही ज्या पुरवठागार किंवा इतर कंपन्यांसोबत काम करतो त्यांनीही नैतिकतेने काम करावे आणि कायद्यांचे पालन करावे अशी आम्ही अपेक्षा करतो.

प्र: आपल्या पुरवठागारांपैकी एक अल्पवयीन कामगारांचा वापर करत असल्याचा संशय मला आहे? मी काय करायला हवे?

उ: जर आपल्या पुरवठागारांपैकी एक बालमजूरीचा वापर करत आहे असा तुम्हाला संशय असल्यास, तुम्ही त्वरित तुमच्या व्यवस्थापकाला किंवा कायदेशीर अनुपालन तज्ज्ञाला सूचित करावे.

प्र: आपल्या उत्तर अमेरीकन पुरवठागारासोबत संवाद साधणार्या भूमिकेसाठी मी आपल्या ट्रोय, मिशिगन, कार्यालयामध्ये कोणाएकाला पदोन्नती देण्याचा विचार करत आहे. जरी तिच्याकडे सर्व आवश्यक पात्रता असली, तरी तिच्या शारीरिक अक्षमतेमुळे आपल्या पुरवठागारांपैकी काही जणांना गैर-सोयीचे वाटू शकते अशी चिंता मला आहे. कोणा इतराला पदोन्नती देण्यासाठी हे कायदेशीर कारण आहे का?

उ: नाही. शारीरिक अक्षमतेसारख्या कायदेशीररित्या संरक्षित आधारावर कोणत्याही भेदभावाशिवाय सर्वांना पुढे जाण्याची समान संधी पुरवण्याचे प्रयत्न आपण करतो. जर कर्मचार्यांची त्या कामासाठी योग्य पात्रता असेल, तर तुम्ही तिच्या शारीरिक अक्षमतेवर आधारित तिच्या पदोन्नतीला नकार देऊ शकत नाही.

Driving Integrity
Know it. Speak it. Live it.

# विविधता आणि अंतर्भाव

आपल्या जागतिक कंपनीसाठी सामर्थ्याचा स्रोत हा आपल्या कर्मचार्यांची विविधता आहे. त्यामुळे आम्ही विविध पार्श्वभूमी, क्षमता आणि मत असलेल्या लोकांना महत्त्व आणि आदर देतो.

भेदभाव आणि छळवणूकीला प्रतिबंध करणार्यांसह आम्ही सर्व लागू होणार्या श्रमिक आणि रोजगार आणि फरकाला इष्टतम जागा देणार्या कायद्यांना बांधिल आहोत. लिंग, जात, पारंपारिक पार्श्वभूमी, धर्म, अक्षमता किंवा कोणत्याही कायद्याने संरक्षित कोणत्याही खाजगी गुणधर्मावर आधारित भेदभवाशिवाय सर्वांना समान रोजकार आणि करीअर संधी पुरवण्यासाठी आम्ही वचनबद्ध आहोत.





# आपल्या कृतींमधून सचोटीला चालना देणे


| | |
|---|---|
| गोपनीय माहितीचा वापर | 19 |
| गुंतवणूक आणि कॉर्पोरेट संधी | 19 |
| स्वयं-व्यवहार आणि नातेवाईक किंवा मित्रांसोबत संवाद साधणे | 20 |
| बहिर्गत पदे | 21 |
| भेटी, जेवण आणि मनोरंजन | 21 |

# गोपनीय माहितीचा वापर

इतर कोणत्याही मालमत्तेप्रमाणे, गोपनीय माहिती, ज्यामध्ये व्यापारी गुपिते आणि आपण, आपले ग्राहक आणि पुरवठागार यांच्याशी संबंधित मालकीची माहिती यांचा समावेश होतो, हा आपल्या व्यवसायाचा मौल्यवान भाग आहे आणि आम्ही तिचे संरक्षण करण्यासाठी वचनबद्ध आहोत. कायद्याने आवश्यकता असेपर्यंत किंवा कोणत्याही अनधिकृत व्यवसायिक हेतूकरिता अशी माहिती Magna च्या बाहेर कोणासोबतही सामायिक केली जाऊ नये.

प्र: Magna च्या गोपनीय माहितीचे संरक्षण करण्यासाठी मी काय करू शकतो?

उ: गोपनीय माहितीचे रक्षण करण्यासाठी तुम्ही Magna ला मदत करण्यासाठी उचलू शकता असे अनेक टप्पे आहेत. तुम्ही गोपनीय नोंदी आणि माहिती मोठ्या काळजीने बाळगावी आणि विशेषत: प्रवास किंवा व्यवसायिक प्रसंगांदरम्यान, दीर्घकाळासाठी तुमची विद्युत उपकरणे अप्राप्य ठेवू नयेत. तुम्ही गर्दी असलेल्या एलिवेटर किंवा विमानासारख्या सार्वजनिक ठिकाणी Magna च्या व्यवसायाची चर्चा करण्याचे टाळावे.

# गुंतवणूक आणि कॉर्पोरेट संधी

Magna कर्मचारी म्हणून, आपण Magna च्या स्वारस्याच्या आड येणार्या वैयक्तिक स्वारस्याच्या स्थिती किंवा तो प्रभाव देणार्या स्थिती टाळायला हव्यात.


उदाहरणार्थ, तुमच्या पदामुळे किंवा Magna ची मालमत्ता किंवा माहितीचा वापर करून त्याद्वारे तुम्ही व्यवसाय संधी शोधून काढली, तुम्ही त्याचा फायदा घेऊ नये. तुम्हाला तुमच्या खाजगी फायद्यासाठी Magna ची संसाधने वापरण्यापासून परावृत्त करण्यात येते, तुम्ही अशा कोणत्याही कृतीमध्ये सहभागी होऊ नये जी तुम्हाला Magna सोबत स्पर्धेमध्ये टाकेल.

## गोपनीय माहिती ही आपल्या व्यवसायाचा मौल्यवान भाग आहे आणि तिचे रक्षण्याची जबाबदारी आपल्यावर आहे.

Driving Integrity
Know it. Speak it. Live it.

प्र: मी इंजिनिअरींगमध्ये काम करतो आणि माझ्या कामादरम्यान मला नवीन ट्रान्समिशन डिजाईन मिळाले जे मला वाटते आपल्या काही ऑटोमोटीव्ह ग्राहकांच्या स्वारस्याचे असू शकते. मला डिजाईन मिळाले असल्यामुळे, मी त्याची विक्री त्यांना प्रत्यक्षपणे करू शकतो का?

उ: नाही, असे केल्यास तुम्ही संहितेचा भंग कराल. तुमच्या नोकरीचा भाग म्हणून तुम्ही निर्माण केलेल्या कोणतीही बौद्धिक संपदा ही Magna च्या मालकीची असते. भर म्हणून, तुमच्या रोजगारादरम्यान आणि Magna ची संसाधने वापरून तुम्ही विकसित केलेली रचना ही Magna ला मौल्यवान व्यवसाय संधी पुरवते. Magna ची परवानगी घेतल्याशिवाय तुम्ही त्याचा खाजगी फायदा घेऊ शकत नाही.



# स्वयं-व्यवहार आणि नातेवाईक किंवा मित्रांसोबत संवाद साधणे

आपण आपले वैयक्तिक स्वारस्य आणि संबंधांना आपल्या कार्य जबाबदार्यांमध्ये हस्तक्षेप करण्यास परवानगी देऊ नये. त्यामुळे, जर आपल्यापैकी कोणसाठीही प्रत्यक्ष नातेवाईक किंवा जवळाच्या मित्राची देखरेख करणे किंवा त्यांच्यासोबत प्रत्यक्ष वृत्तांत संबंध ठेवणे अयोग्य आहे. नातेवाईक किंवा जवळचे मित्र किंवा आपले किंवा नातेवाईक किंवा जवळच्या मित्रांचे लक्षणीय स्वारस्य असलेल्या व्यवसाय किंवा संघटनेमध्ये नियुक्ती करणे, मूल्यांकन करणे, ला निधी पुरवणे किंवा करारामध्ये किंवा इतर व्यवसाय संबंधांमध्ये प्रवेश करण्याच्या पदावर असणे हे योग्य नाही.

विशेषत:, जर तुमचे कार्य निर्णय हे तुमचे नातेवाईक किंवा जवळाच्या मित्राच्या पदाने, प्रभावीत असतील किंवा प्रभावीत असल्याचे दिसत असतील, किंवा तुम्ही किंवा तुमच्या नातेवाईक किंवा जवळाच्या मित्राचे लक्षणीय स्वारस्य हे इतर व्यवसाय किंवा संघटनेमध्ये असे, तर हे तुमच्या पर्यवेक्षकाला कळवावे. सर्व व्यवहार आणि निर्णय हे नि:पक्षपाती आणि पारदर्शक आधारावर करण्यात आले आहे याच्या खात्रीकरिता तुम्ही त्याठीकाणी असलेल्या कोणत्याही प्रक्रियांचे पालन करावे.

प्र: मी खरेदी विभागातील खरेदीदार आहे. माझी पत्नी आमच्या एका पुरवठागाराकडे विक्री अध्यक्ष म्हणून अलिकडेच नियुक्त झाली आहे. हा संघर्ष आहे का?

उ: होय तुमच्या पत्नीची नवीन भूमिका तुमच्या व्यवसाय निर्णयांवर प्रभाव टाकण्याची शक्यता असते किंवा ती इतरांना तसे भासवते. त्यामुळे तुम्ही या माहितीसह तुमच्या पर्यवेक्षकाकडे जावे. अशा प्रकारे, व्यवस्थापन स्थितीचे मूल्यांकन करेल आणि योग्य उपाय घेतील. असे केल्यास, ते Magna आणि तुम्हाला आणि तुमच्या पत्नीला अयोग्य आचाराच्या कोणत्याही दोषापासून संरक्षित करते.

Driving Integrity
Know it. Speak it. Live it.

# बहिर्गत पदे

Magna आ यशस्वी होण्यामध्ये मदत करण्यासाठी, आम्ही आपला पूर्ण वेळ आणि लक्ष हे कार्यालयिन तासांदरम्यान आपल्या कामावर समर्पित करावे. त्यामुळे, तुम्ही कोणत्याही बहिर्गत वचनबद्धता स्वीकारणार नाही, त्यामुळे तुम्ही तुमच्या कामावर समर्पित करणारा वेळ आणि लक्ष कमी होऊ शकते.

याची पर्यवेक्षकासोबत चर्चा केल्याशिवाय आणि आवश्यक परवानगी घेतल्याशिवाय, तुम्हाला Magna च्या स्वारस्यासोबत विरोधी किंवा तसा आभास करणारी देय किंवा अवनैतिक पदे स्वीकारण्यापासून मनाई करण्यात येते.

# भेटी, जेवण आणि मनोरंजन

आपला सर्व व्यवसाय भागीदारांसोबत असलेले संबंध हे एकात्मता आणि चांगल्या व्यवसाय निर्णयांवर अवलंबून असावेत. परिणामी, जर आम्ही भेटी किंवा मनोरंजन दिले किंवा मिळवले, आपण आपल्या नि:पक्षपाती व्यवहारासाठी आणि Magna ला फायदा होईल असे निर्णय घेण्याच्या वचनबद्धतेची तडजोड करू नये किंवा तडजोड करत आहे असे भासवण्याबद्दल काळजी घ्यावी.

ग्राहक आणि पुरवठागारांसोबतच्या आमच्या व्यवसायिक संबंधामध्ये, जोपर्यंत इष्टतम आहेत, प्रासंगिक आहे आणि मर्यादित किमतीच्या आहे तोपर्यंत व्यवसायिक भेटी किंवा मनोरंजन देणे किंवा मिळवणे स्वीकार्य आहे. आपण पुरवतो ती कोणतीही भेट किंवा मनोरंजनाची, आपल्या खर्च अहवालात आणि Magna ची पुस्तके आणि नोंदींमध्ये अचूकपणे किंवा पारदर्शकपणे नोंद केली जावी.


वाढलेल्या कायदेशीर जोखमींमुळे, शासकीय अधिकार्यांसोबत. व्यवहार करताना आपण सर्वांनी विशेष काळजी घ्यायला हवी. शासकीय कर्मचार्यांना भेटी किंवा मनोरंजन प्रदान करताना, Magna मधील अधिकृत व्यक्तीकडून लेखी स्वीकृतीची आवश्यकता असते. आवश्यक आलेल्या स्वीकृतीची चर्चा तसे भेटी आणि मनोरंजनाविषयीची अतिरिक्त माहिती ही आमच्या भेटी आणि मनोरंजनावरील धोरणामध्ये पाहायला मिळू शकते.

प्र: आपल्या पुरवठागारांपैकी एकाने मला स्पर्धेमधील माझ्या पसंतीच्या संघाचा खेळ पाहाण्यासाठी विमानाचे तिकीट दिले. हे ठीक आहे का?

उ: नाही. आपले व्यवसायिक निर्णय हे नेहमी पूर्णपणे Magna च्या उत्तम स्वारस्याद्वारे प्रेरित असायला हवेत. या अतिव्ययी भेटी स्वीकारल्यास तुम्ही त्या पुरवठागाराला भविष्यातील सोर्सिंगसाठी त्यांच्यावतीने निर्णय घेऊ शकण्याचा प्रभाव देते. तुम्ही केवळ इष्टतम, प्रासंगिक आणि मर्यादित किमतीच्या असणार्या व्यवसायिक भेटी आणि मनोरंजन स्वीकारू शकता. जर तुम्हाला कधीही शंका असेल, तर तुमच्या सर्वसाधारण व्यवस्थापक किंवा कायदेशीर अनुपालन तज्ञाकडून तपासून घ्यावे.

प्र: वर्षामध्ये अनेक वेळा माझ्या विभागामध्ये पर्यावरणीय तपासणी आयोजित केलेला शासकीय तपासणीसाला पुढच्या महिन्यामध्ये बाळ होणार आहे. मी त्याला भेट म्हणून व्हिस्कीची बाटाली देऊ इच्छित आहे. याची परवानगी आहे का?

उ: शासकीय अधिकार्याला भेटी किंवा मनोरंजन देताना अधिकृत व्यक्तीकडून अतिरिक्त सावधगीरी आणि स्वीकृतीची गरज असते. तुम्ही तुमच्या सर्वसाधारण व्यवस्थापक किंवा कायदेशीर अनुपालन तज्ञाशी बोलावे.



# चांगल्या संप्रेषणासोबत सचोटीला चालना देणे


काळजीपूर्वक संप्रेषण 23

दि गुड बिजनेस लाईन 24

# काळजीपूर्वक संप्रेषण

कामावर असताना आणि कामाच्या बाहेर असताना आपण काय लिहितो आणि बोलतो त्याची खात्री करावी कारण ते आमच्याकडून अपेक्षित असलेली सचोटी आणि मानके दर्शवत असतात.

Magna आणि तुमच्या स्वत:च्या पतीचे रक्षण करण्यासाठी, सर्व लेखी संप्रेषणे काळजीपूर्वक आणि एक दिवस ती प्रकाशित केली जाणार आहेत याची जाणीव ठेवून तयार केली जावीत हे महत्त्वाचे आहे. तुम्ही तुमच्या स्वत:ची संगणक यंत्रणा वापरून गैर-कार्यालयिन तासांमध्ये संप्रेषणाकरिता भाषणाचे स्वातंत्र्य आणि सर्व कायदेशीर अधिकारांचा आनंद घेता, परंतु कंपनीची बदनामी करणे, पुरवठागार किंवा ग्राहकांविषयी तुच्छतापूर्वक बोलणे, व्यापारी गुपित उघड करणे किंवा Magna च्या कॉपीराईट आणि पेटंट हक्कांचे उल्लंघन करणारी कोणतीही पोस्ट सामाजिक माध्यम सामग्रीमध्ये करू नये याविषयी काळजी बाळगावी.

अतिरिक्त म्हणजे, जर बातमी माध्यम रिपोर्टर, औद्योगिक व्यवसायिक किंवा भागधारकाने तुम्हाला Magna शी संबंधित मुद्द्याविषयी चर्चा किंवा टिप्पणी करण्यास विचारले, तर तुम्ही टिप्पण्या न पुरवता त्यांना Magna च्या अधिकृत प्रवक्त्याचा संदर्भ द्यावा.

Magna चे काळजीपूर्वक संप्रेषणावरील धोरण,आपले ग्लोबल ईमेल, इंटरनेट आणि सामाजिक माध्यम धोरण आणि आपले बहिर्गत माध्यम संप्रेषण धोरण हे संप्रेषणाशी संबंधित मुद्द्यांकरिता सर्व उपयोगी स्रोत आहेत.

प्र: माझे 250 मित्र आहेत अशा माझ्या फेसबुक पृष्ठावर मी आपल्या एका पुरवठागासोबत माझी निराशा प्रासंगिकपणे बोलून दाखवतो. हे मी माझ्या स्वत:च्या वेळामध्ये करतो आणि माझ्या सेटिंग्ज खाजगी आहेत त्यामुळे केवळ माझे मित्र आणि कुटुंबिय अद्यतने पाहू शकतात. हे ठीक आहे का?

उ: नाही. सामायिक माध्यमावर पोस्ट करणे हे नेहमी खाजगी राहत नाही. तुम्ही Magna च्या पुरवठागारांना कोणत्याही सार्वजनिक फोरममध्ये निराश करण्यापासून स्वत:ला परावृत्त करावे. जर तुम्हाला आपला पुरवठागार संहितेचा भंगाशी संबंधित आहे अशी काळाजी असेल, तर तुम्ही याची माहिती तुमचा पर्यवेक्षक किंवा कायदेशीर अनुपालन तज्ञ किंवा गुड बिजनेस लाईनला कळवावी. इतर समस्या या Magnaच्या निर्भय मतप्रदर्शन प्रक्रियेचा वापर करून उत्तम प्रकारे संबोधल्या जाऊ शकतात.

प्र: मला ऑनलाईन पोस्ट केलेल्या वृत्तपत्र लेखामध्ये Magna च्या आर्थिक परिणामाविषयीची काही चुकीची माहिती आढळली. मला योग्य माहितीसह वृत्तपत्राच्या वेबसाईटवर टिपणी लिहायची इच्छा आहे. मी तसे करावे का?

उ: नाही. तुम्ही त्वरित कॉर्पोरेट कम्युनिकेशन्स किंवा गुंतवणुकदार संबंधांपैकी कोणालाही चुकीच्या माहितीविषयी त्वरित सूचित करावे. जर तुम्ही Magna च्या व्यवसायाविषयी माहिती पोस्ट केली, तर तुम्ही कंपनीसाठी अनधिकृत प्रवक्ता म्हणून कार्य करत असता.

कामावर असताना आणि कामाच्या बाहेर असताना आपण काय लिहितो आणि बोलतो त्याची खात्री करावी कारण ते आमच्याकडून अपेक्षित असलेली सचोटी आणि मानके दर्शवत असतात.

# दि गुड बिजनेस लाईन

जर तुम्हाला या संहितेच्या किंवा कोणत्याही संबंधित पॉलिसीच्या उल्लंघनाविषयी माहिती असेल, तर तुम्ही नेहमी तुमचे पर्यवेक्षक किंवा कायदेशीर अनुपालन तज्ञाशी बोलू शकता.

तुम्ही Magna च्या गुड बिजनेस लाईनलाही संपर्क करू शकता. तुम्हीwww.Magna gbl.com येथे ऑनलाईन अहवाल सुपूर्द करू शकता किंवा तुम्ही तुमच्या देशासाठीच्या स्थानिक टोल मुक्त दूरध्वनी क्रमांकाचा ही वापर करू शकता. ही सेवा स्वतंत्र, बहिर्गत कंपनीद्वारे पुरवली जाते आणि ती वर्षाच्या 365 दिवस, दिवसाच्या 24 तास उपलब्ध असते. कायद्याने प्रतिबंधित असेपर्यंत(त्याबाबतीत तुम्ही तुमचा अहवाल करण्यापूर्वी तुम्हाला कळवण्यात येईल), तुम्ही तुमचे अहवाल निनावी पुरवू शकता. तरीही, पुरेसे तपशील पुरवा जेणेकरून तुमच्या समस्यांवर प्रभावीपणे अन्वेषण करण्यात येईल.

तुम्ही आचारसंहिता आणि नैतिक मूल्यांच्या कोणत्याही उल्लंघनाविषयी चिंतेची माहिती देण्यास गुड फेथ अहवाल करण्यास कधीही संकोच करू नका. जर कर्मचार्याने चांगल्या निष्ठेने खरी चिंता कळवली तर कोणालाही त्याविरूद्ध सूड घेण्यापासून आम्ही मनाई करतो. सूड घेणे हे कोणतेही स्वरूप घेऊ शकते आणि त्यामध्ये दंड आकारणे, उन्मुक्त करणे, अवनत करणे, निलंबन करणे, भीती घालणे किंवा छळवणूक करणे यांचा समावेश होतो. आचार संहिता आणि नैतिक मूल्यांच्या उल्लंघनाविषयी खरी चिंता कळवलेल्या व्यक्ती विरूद्ध आम्ही अशा कोणत्याही सूडाच्या कृतींना सहन करत नाही.

आमचे सूड-रोधी धोरण या मुद्द्यावरील अधिक माहिती पुरवते.

प्र: माझा पर्यवेक्षक संहितेचे उल्लंघन करत असल्याचे मला वाटते, परंतु तिच्या वर्गणूकीविषयी माहिती दिल्यास हे माझ्या रोजगारावर उलट परिणाम करेल असे मला वाटते. जर मी माझ्या पर्यवेक्षकाच्या वर्तणूकीबद्दल माहिती दिली आहे हे त्याला कळाल्यास Magna माझे संरक्षण करेल का?

उ: होय आमच सूड रोधी धोरण तुमच्या पर्यवेक्षकाला तुमच्याविरूद्ध कृती करण्यास मनाई करते आणि तुमच्यासारख्या संहितेच्या उल्लंघनाविषयी चांगल्या निष्ठेने माहिती दिलेल्या कर्मचार्यांचे संरक्षण करते.

प्र: दि गुड बिजनेस लाईन वापरून मी उल्लंघनाविषयी सूचना दिल्यास काय होईल?

उ: जेव्हा आम्हाला गुड बिजनेस लाईनद्वारे अहवाल मिळतो, तेव्हा आम्ही संहितेचा भंग झाले आहे किंवा नाही हे निश्चित करण्यासाठी सखोल अन्वेषण करतो. आम्ही अन्वेषणे जबाबदारीने आयोजित करण्याची आणि आवश्यकता असल्यास तज्ञांकडून मदत घेण्याची काळजी घेतो. संहितेचे उल्लंघन केलेल्या कोणत्याही अहवालाचा प्रथम आमच्या गुड बिजनेस लाईन प्रशासकांद्वारे (जे Magna चे मुख्य अनुपालन अधिकारी, एंटरप्राईज जोखीम व्यवस्थापनाचे उपाध्यक्ष, आणि कॉर्पोरेट कायदा विभागातील किमान एक सदस्य अशाप्रकारे तयार केलेले असते) आढावा घेतला जातो. प्रशासक हे अन्वेषणाची आवश्यकता आहे किंवा नाही आणि ते कॉर्पोरेट कार्यालय किंवा गट पातळीवर हाताळले जावे किंवा नाही याविषयी निर्णय घेतील. जर अन्वेषण आवश्यक असेल, तर ते समर्पित अन्वेषण संघाद्वारे आयोजित करण्यात येईल. अन्वेषणाचे परिणाम हे सुधारणात्मक आणि दंडात्मक कारवायांसाठी शिफारशींसह गुड बिजनेस लाईन प्रशासकांना कळवले जाते.

Driving Integrity
Know it.
Speak it.
Live it.

# कायदेशीर अनुपालन तज्ञाकडून समर्थन

जर तुम्हाला आपली आचारसंहिता आणि नैतिक मूल्यांविषयी काही प्रश्न असतील किंवा माहिती हवी असेल, तर तुम्ही Magna च्या कायदेशीर अनुपालन तज्ञांशी संपर्क साधू शकता. अशा तज्ञांची सूची Magna .com वर किंवा MagNET वरील मूल्ये आणि कायदेशीर अनुपालन पृष्ठावर मिळू शकते.





# शब्दवली

**लाच:** व्यवसाय किंवा इतर कोणताही फायदा मिळवण्याच्या हेतूने कोणालाही त्याच्या किंवा तिच्या खाजगी फायद्यासाठी मुल्य असलेलेल काहीही देणे किंवा ऑफर करणे. यामध्ये लहान रकमांच्य प्रदानांचा समावेश होतो- काहीवेळा याला निम्न स्तरीय शासकीय अधिकार्यांद्वारे नियमित सेवा मिळवण्यासाठी ते अन्यथा हक्कदार आहेत त्यासाठी दिलेली "फॅसिलिटेशन प्रदाने" किंवा "ग्रीज प्रदाने" असे म्हटले जाते.

**अनुपालन:** याचा अर्थ, आपण आपल्याला लागू होणार्या कायद्यांच्या अक्षरांचे आणि खर्या हेतूंचे, या संहितेचे आणि सर्व Magna धोरणांचे पालन करावे,

**चांगला विश्वास:** प्रामाणिक आणि खर्या हेतूसह.

**शासकीय अधिकारी:** शासन, विभाग किंवा एजेंसी, कोणतीही सार्वजनिक आंतरराष्ट्रीय एजेंसीचा अधिकारी किंवा कर्मचारी, किंवा शासनाच्या वतीने कोणत्याही कार्यालयिन क्षमतेमध्ये काम करणारी कोणतीही व्यक्ती, तसेच Magna च्या कार्यपद्धतींनुसार शासकीय अधिकारी असणारी इतर व्यक्ती.

**अंतर्गत माहिती** गुंतवणूकदार किंवा जनतेला माहिती नसलेली माहिती, जर ती ज्ञात असेल, तर ती कंपनीचे, किंवा तिचे भाग किंवा बॉन्ड्सचे मुल्य यासंबंधित त्यांचा दृष्टीकोन मोठ्याप्रमाणात बदलू शकते. लक्षणीय संपादन किंवा एकत्रीकरण, वरिष्ठ व्यवस्थापनामध्ये बदल, लक्षणीय दावा किंवा श्रमिक वाद यांचा उदाहरणामध्ये समावेश होतो.

**दलाली:** लाचेचा एक प्रकार ज्यामध्ये व्यवसायिक मांडणीला बळकट करण्यासाठी पैशांच्या स्वरूपातील रक्कम आधीच दिलेली असते किंवा प्रदानासाठी देय ही वैयक्तिक पुरस्कार म्हणून परत केली जाते.

**प्रचार करणे:** सार्वजनिक कार्यालयात निवडलेले व्यक्ती, कर्मचारी आणि शासकीय एजेंसीजचे कर्मचारी यांसह शासनाच्या कोणत्याही पातळीवरील शासकीय अधिकार्यांसोबत संप्रेषण, जे निर्णय क्षमतेला प्रोत्साहित, विरोध किंवा अन्यथा त्यावर प्रभाव टाकण्यासाठी उद्देशित असेल.

**नातेवाईक किंवा जवळचे मित्र:** पत्नी, स्थानिक भागीदार, पाल्य, पालक, आजीआजोबा, नातु, भावंडे, काकी, काका, भाची, पुतण्या, जावयाचे नातेवाईक, सावत्र/ दत्तक घेतलेले/ संगोपन संबंध, तुमच्या घरामध्ये राहणार्याशी संबंढित व्यक्ती आणि तुम्ही कामाच्या बाहेर समाजामध्ये वावरता असा मित्र यांचा समावेश होतो.

**मूल्य असलेली वस्तू:** ती पैसा, भेटी, मदतीसाठी देणगी, अतिरिक्त प्रवास आणि मनोरंजन खर्च, शैक्षणिक खर्च, भविष्यातील रोजगाराकरिता अवाहन किंआ कंपनीच्या भागांचे, इतर अनेक वस्तूंदरम्यान, स्वरूप घेऊ शकते.

**तृतीय पक्ष:** व्यक्ती, संघटना किंवा Magna च्या बाहेर संचालित व्यवसाय



प्रभावी दिनांक: 01 मे 2016
अंतिम आढावा दिनांक: 01 मे 2016
पुढचा आढावा दिनांक: 01 मे 2019
द्वारे जारी: नैतिक मूल्ये आणि कायदेशीर अनुपालन
द्वारे स्वीकृत: संचालक मंडळ

Magna .com


Driving Integrity
Know it.
Speak it.
Live it.